# देगलूर महाविद्यालयात पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

देशोन्नती वृत्तसंकलन...



देगलूर ■ जगाच्या इतिहासात महान कर्तृत्ववान आणि शौर्यवान स्त्रियाच्या यादीत असणाऱ्या, भारतातील अनेक प्राचिन मंदिराचा जीर्णोध्दार करुन भारतीय संस्कृती जपणाऱ्या, प्रत्यक्ष युद्धभूमीवर कर्तृत्व दाखविणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाई खंडेराव होळकर यांच्या जयंतीनिमित्त आज देगलूर महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला.

स्वातंत्र्य, समता, बंधूता व सामजिक न्याय या मानवी मुल्यावर आधारित राज्यकारभार त्यांनी केला. होळकर यांच्या जयंती निमित्तच्या अभिवादन कार्यक्रमास आडत व्यापार शि.स्था.चे अध्यक्ष प्रकाश पाटील, सचिव शशिकांत चिद्रावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार, कार्यकारी सदस्य देवेंद्र मोतेवार, रविंद्र ध्याडे, इंजिनीयर भरत अटकळीकर, प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, प्रा.डॉ. नरवाडे यांच्यासह शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.